--------------------------------------------------------------------------------

# NSS Report-2021-22

## Department of National Service Scheme (NSS)

२०२१-२२ शैक्षणिक वर्षात देखील कोरोना महामारीचे सावट होते. तरीही सामाजिक भान आणि आपली जबाबदारी ओळखून राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे अनेक समाजोपयोगी कार्यक्रम आणि उपक्रम हाती घेण्यात आले आणि यशस्वीरीत्या पार पाडण्यात आले. त्याचा संक्षिप्त अहवाल सारांश रुपाने पुढीलप्रमाणे मांडला आहे.

२१ जून २०२२ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त प्रात्यक्षिकच्या माध्यमातून योगा प्रशिक्षण ऑनलाईन पध्दतीने विद्यार्थ्यांना देण्यात आले. त्यामध्ये एकूण ४९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. सदर वर्षात नैर्सगिक आपत्तीमुळे देखील अनेक प्रकारचे नुकसान झाले, अनेक ठिकाणी मदत पोहोचली नव्हती पण तरीही अशी दुर्गम भागातील घरे मदतीपासून वंचित राहू नयेत हे एकमेव उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेऊन विभागाने मारळ आणि बामणोली येथील दुर्गम भागात अन्न-धान्य, कपडे आणि इतर जीवनोपयोगी अत्यावश्यक साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच चिपळूण येथील महापुराने अनेक घरे आणि दुकाने उध्वस्त केली. संपूर्ण शहरात घाणीचे साम्राज्य आणि दुर्गंधी पसरली होती. अशा वेळी पुढाकार घेऊन विद्यार्थी व प्राध्यापकांनी तेथे प्रत्यक्षपणे जाऊन स्वच्छता केली, तसेच अन्न-धान्य, खाण्याचे इतर साहित्य, स्वच्छ पिण्यायोग्य पाणी आणि कपडे इत्यादी साहित्याचे वाटप तेथील पूरग्रस्त नागरिकांना आणि आजूबाजूच्या गावातील लोकांना पुरविण्यात आले.

पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण करण्याची आवश्यकता लक्षात घेऊन विभागाने १००० रोपे गट विकास अधिकारी, पंचायत समिती, देवरुख यांच्या मार्फत भाबेड, लांजा येथून आणून विद्यार्थ्यांमध्ये वाटप करण्यात आले. २ ऑक्टोबर रोजी गांधी जयंती, लाल बहादूर शास्त्री जयंती निमित्त अनेक कार्यक्रम पार पाडण्यात आले. त्यामध्ये महात्मा गांधीजी आणि लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन करुन शपथ घेण्यात आली. विद्यार्थ्यांना म. गांधी यांच्या विषयी डॉक्युमेंट्री फिल्म दाखविण्यात आली, महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना वृक्ष वाटप केले. विद्यार्थ्यांनी महाविद्यालय परिसरात साफसफाई केली. विद्यार्थ्यांनी मराठा कॉलनी येथे जाऊन वृक्षारोपण केले तसेच घरी देखील वृक्ष लागवड केली. ऑनलाईन क्विझचे ही आयोजन करण्यात आले.

राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि रत्नागिरी शासकीय जिल्हा रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ५ ऑक्टोबर २०२१ रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. त्यात एकूण १४ रक्तदात्यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले.

११ ऑक्टोबर हा जागतिक मुलगी दिन साजरा करण्यात आला, हा दिवस साजरा करण्यामागे मुलींसमोर असणाऱ्या विविध समस्या आणि त्यांच्या अधिकारांचे संरक्षण व्हावे हाच प्रमुख उद्देश आहे. हा उद्देश लक्षात घेऊन जागतिक मुलगी दिनाचे औचीत्य साधून बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. त्यातून स्त्री-पुरुष समानता असा संदेश समाजात रुजविणे प्रमुख हेतू होता.

श्रमदानाचा एक प्रमुख भाग म्हणून महाविद्यालयाची इमारत सुशोभित करणे अभिप्रेत आहे. त्यासाठी विद्यार्थी आणि कार्यक्रम अधिकाऱ्यांनी पुढाकार घेऊन मा. प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली २ प्रशस्त वर्ग खोल्या उत्तम पध्दतीने रंगविल्या आहेत, त्यासाठी विद्यार्थी नाताळ सुट्टीत येऊन रंगकाम करण्याचे श्रमदान करीत होते व त्या प्रसंगी मा. प्राचार्य स्वतः भेट देऊन विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले.

विभागाचे पाटगाव हे दत्तक गाव असल्याने तेथील गरज लक्षात घेऊन पाटगाव येथे बंधारा बांधण्यात आला, त्यासाठी अनेक राष्ट्रीय छात्र सेना विभागातील विद्यार्थ्यांचे देखील सहकार्य लाभले. निरोगी आरोग्य राखणे ही आज काळाची अत्यावश्यक गरज बनली आहे, ग्रामीण भागातील ग्रामस्थांना आरोग्याप्रती जागरुकता निर्माण व्हावी आणि त्यांना आरोग्य विषयक सुविधा उपलब्ध करुन तळवडे गावी निवासी शिबिराचे आयोजन करण्यात आले, त्याप्रसंगी देवरुख ग्रामीण रुग्णालयाचे सहकार्य लाभले. शिवाय महाविद्यालयात रक्तदान शिबिराचे देखील आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये १९ रक्तदात्यांनी

आपला सहभाग नोंदविला आणि त्यासाठी रत्नागिरी सिव्हील हॉस्पिटलचे सहकार्य लाभले होते. 'आझादी का अमृत महोत्सव' अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि आजीवन अध्ययन विस्तार विभाग यांच्या तर्फे आयोजित ८ फेब्रुवारी २०२२ रोजी, 'सायकल रॅली' चे आयोजन करण्यात आले. रॅलीची सुरुवात महाविद्यालयीन क्रीडांगणावरून झाली. महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ. नरेंद्र तेंडोलकर, उप प्राचार्य डॉ. सरदार पाटील, नायब तहसीलदार श्री. पंडित, पोलीस अधिकारी आणि कर्मचारी देखील उपस्थित होते. मा. प्राचार्यांनी उपस्थितांचे स्वागत केले आणि सहभागी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. सायकल रॅलीला विद्यार्थ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळाला, एकूण २५ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला. सदरचा उपक्रम योग्य रितीने पार पाडण्यासाठी मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. वर्षा फाटक यांचे सहकार्य लाभले. सदर रॅलीचा प्रवास मार्ग हा महाविद्यालयापासून माणिक चौक, स्टेट बँक मार्गे तहसीलदार कार्यालय तेथून सह्याद्री नगर, साडवली आणि वाघजाई देवीचे मंदिर असा होता. सायकल रॅली साडवली येथील पांडवकालीन गुंफा या ऐतिहासिक जागेला भेट देऊन तेथील गुंफेची साफसफाई करण्यात आली तसेच जवळच असलेल्या वाघजाई मंदिराची देखील साफसफाई करण्यात आली.

श्रमदान, रक्तदान आणि समाजाभिमुख इतर उपक्रम राबवीत असतानाच विविध विषयांवर उत्तम साधन व्यक्तींना आमंत्रित करुन विद्यार्थ्यांसाठी व्याख्यान आयोजित करण्यात आले. 'व्यसनाधीनता एक प्रमुख सामाजिक समस्या' कशी भेडसावत आहे? तरुण वर्ग त्याला कसा आहारी जात आहे? आणि त्यावरील उपाययोजना या विषयावर सर्वांगीण माहिती देण्यासाठी अमली पदार्थांचे गैर वर्तन आणि अवैध तस्करी या विषयावर व्याख्याने आयोजित करण्यात आले होत. तसेच 'स्त्रिया आणि अंधश्रध्दा' या विषयावर देखील ऑनलाईन पध्दतीने व्याख्यान आयोजित करण्यात आले. महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग, मराठी आणि ग्रंथालय विभाग यांच्या तर्फे एड्स सप्ताहानिमित्त 'एड्स जनजागृती' विषयावर निबंध स्पर्धा आणि वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. त्यामध्ये जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता आणि त्यात सुयश प्राप्त केले. तसेच राष्ट्रीय सेवा योजना, रेड रिबन क्लब आणि मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने सादरीकरण कौशल्य स्पर्धा आयोजित करण्यात आली. त्यामध्ये देखील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला होता. छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त महाविद्यालयात विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. प्रमुख व्याख्याते म्हणून श्रीनिवास पेंडसे यांना आमंत्रित करण्यात आले. त्यांनी 'छत्रपती शिवाजी महाराज यांचे व्यवस्थापन कौशल्य'यावर उपस्थितांना मार्गदर्शन केले.

अशा प्रकारे वरील उपक्रम आणि व्याख्यानां व्यतिरिक्त अनेक समाजोपयोगी आणि विद्यार्थी केंद्रित कार्यक्रम हाती घेण्यात आले होते. वर्षभरात येणाऱ्या जयंतीनिमित्त संबंधित महनीय यांच्या आठवणींना उजाळा देऊन व त्यांच्या योगदानाबद्दल सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांना एकत्रित करुन प्रबोधन करण्यात आले. विभागातील सर्व प्राध्यापक आणि स्वयंसेवक मा. प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक उपक्रमांमध्ये पुढाकार घेण्यास नेहमीच उत्सुक असतात.

**प्रा. सुनिल सोनावणे**
प्रमुख, रासेयो कार्यक्रम अधिकारी